# Savitribai Phule Pune University
**(Formerly University of Pune)**

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
**(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)**

**Prof. (Dr.) Prabhakar Desai**
**Officiating Director,**
**Board of Examinations & Evaluation**
Ganeshkhind, Pune-411007
E-mail : coe@unipune.ac.in
bee@pun.unipune.ac.in

**प्रा. (डॉ.) प्रभाकर देसाई**
**प्रभारी संचालक,**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**
गणेशखिंड, पुणे-४११००७
दूरध्वनी: +९१ २० २५६२१३४०/४५


संदर्भ : पमूमं/२०२६/१६ दिनांक :— २८/०१/२०२६

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व विद्याशाखांचे स्वायत्त महाविद्यालये/परिसंस्था व पूर्वीच्या परिपत्रक क्र. १२५ मधील सर्व अभ्यासक्रम ज्या महाविद्यालयांमध्ये सुरु आहेत अशी सर्व महाविद्यालये

**विषय : मा. प्राचार्य/संचालक व महाविद्यालयीन नोडल अधिकारी (NAD) यांची कार्यशाळा...**

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणांस कळविण्यात येते की, मा.उपसचिव भारत सरकार उच्चस्तर शिक्षाविभाग यांच्या आदेशानूसार शैक्षणिक वर्ष २०२१ पासून पुढील सर्व परीक्षांचे निकालाप्रमाणे गुणपत्रके, पदवी प्रमाणपत्रे डिजीलॉकरवर उपलब्ध करणे अनिवार्य केलेले आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या स्तरावर होणा—या सर्व परीक्षांचे गुणपत्रके व पदवीप्रमाणपत्रे हे उपलब्ध करण्याचे काम हे विद्यापीठ स्तरावर केले जात आहे. परंतु सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित असलेले एकुण ८४ स्वायत्त महाविद्यालये व ज्या संलग्नित महाविद्यालयांमध्ये पूर्वीच्या परिपत्रक क्र. १२५ प्रमाणे अभ्यासक्रम घेतले जातात अशा सर्व अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांची गुणपत्रके डिजीलॉकरवर उपलब्ध करण्याचे काम हे त्या महाविद्यालय स्तरावरच केले जाणे अपेक्षित आहे. संबंधित विषयाबाबत अधिक माहिती देण्यासाठी कार्यशाळेचे नियोजन करण्यात आले आहे. सदर कार्यशाळेकरिता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित स्वायत्त महाविद्यालये आणि विरसित केलेल्या पूर्वीच्या परिपत्रक क्र. १२५ मधील सर्व अभ्यासक्रम ज्या महाविद्यालयांमध्ये सुरु आहेत अशा सर्व महाविद्यालयांचे मा.प्राचार्य/महाविद्यालयीन परीक्षा अधिकारी/महाविद्यालयीन नोडल अधिकारी (NAD) यांनी व्यक्तिशः हजर राहणे अनिवार्य राहील. कार्यशाळेस संबंधितांनी आपले प्रतिनिधी पाठवू नयेत, ही विनंती.

**कार्यक्रमाचा तपशील खालीलप्रमाणे**

| | | |
|---|---|---|
| **कार्यक्रमाची दिनांक व वेळ** | : | शनिवार, ३१ जानेवारी, २०२६ दुपारी २.३० ते सायं.५.०० |
| **कार्यक्रमाचे ठिकाण** | : | पर्यावरणशास्त्र विभाग सभागृह<br>सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ<br>पुणे — ४११००७ |

तरी मा.प्राचार्य/महाविद्यालयीन परीक्षा अधिकारी/महाविद्यालयीन नोडल अधिकारी (NAD) यांना विनंती की, आपण सदर कार्यशाळेस स्वखर्चाने उपस्थित रहावे.

कळावे,

(प्रा.(डॉ.) प्रभाकर देसाई)
प्रभारी संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

Scanned with OKEN Scanner